University of Mumbai

# मुंबई विद्यापीठ
# ई-मासिक वार्तापत्र



मार्च २०२४

वर्ष - ०३ • अंक ०३

**नॅक द्वारा पुनर्मूल्यांकनामध्ये ३.६५ सीजीपीए सहित अ ++ श्रेणी**

# विद्यापीठाचा सर्वसमावेशक विद्यार्थीकेंद्रीत रु. ८५७ कोटींचा अर्थसंकल्प अधिसभेत मंजूर



दिनांक २३ मार्च रोजी आयोजित केलेल्या अधिसभेच्या बैठकीत अर्थसंकल्पावर चर्चा करताना मान्यवर



दिनांक २३ मार्च रोजी आयोजित केलेल्या अधिसभेच्या बैठकीत अर्थसंकल्पावर चर्चा करताना मान्यवर

मुंबई, दि. २३ मार्चः गुणवत्ता, सर्वसमावेशकता आणि उत्कृष्टतेला प्राधान्य देत मुंबई विद्यापीठाचा २०२४- २५ या वित्तीय वर्षाचा रुपये ८५७ कोटींचा अर्थसंकल्प आजच्या अधिसभेत मंजूर करण्यात आला. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या या अधिसभेत यावर्षीचा अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला. यावर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये रुपये १२१ कोटी ६० लाखांची तूट दाखविण्यात आली आहे. २०२४- २५ वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये संशोधन आणि नाविन्यपूर्ण संस्कृती बळकटीकरण, उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयकरण आणि वैश्विक नागरिकत्व शिक्षणासाठी पुढाकार, विद्यार्थी सहाय्य आणि प्रगती उपक्रम, माजी विद्यार्थी कनेक्ट आणि विद्यापीठ- औद्योगिक साहचर्य उपक्रम यासह शैक्षणिक आणि गव्हर्नंस उत्कृष्टता उपक्रमांसाठी ६५ कोटींची भरीव तरतूद करण्यात आली आहे.

यावर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये विविध नाविण्यपूर्ण योजनांसह अनेक विकासकामांना प्राधान्य देण्यात आले आहे. वित्तीय वर्ष २०२४-२५ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्र, प्रा. बाळ आपटे दालन आणि सभागृह, स्कूल ऑफ लँग्वेजेस इमारत दुसरा टप्पा, अवेस्ता पहलवी अभ्यास केंद्र, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी वसतिगृह दुसरा टप्पा, मुलींचे वसतिगृह, वेंगुर्ले उपपरिसराचा विकास आणि तृतीय आणि चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे निवासी संकुल व सामुदायिक सभागृह अशा अनुषंगिक विकासकामांना प्राधान्य देत १२३ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

शैक्षणिक वर्गवारीतील सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार, सर्वोत्कृष्ट शिक्षक पुरस्कार, विद्यापीठ विभाग रँकिंग, शैक्षणिक ऑडिट पोर्टल आणि रँकिंग फ्रेमवर्क, प्रतिष्ठित प्राध्यापकांची व्याख्याने, कुलगुरू योजना, ई-सामग्री विकास आणि महा-स्वयमसाठी शिक्षकांचे प्रशिक्षण, राज्य आणि राष्ट्रीय आंतर-विद्यापीठ/ संस्थात्मक सहयोग आणि संबंध (विद्यार्थी/शिक्षक

विनिमय, संयुक्त संशोधन कार्यक्रम, ट्विनिंग/जॉइंट/ड्युअल डिग्री प्रोग्राम), स्कूल कनेक्ट आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणी (प्रशिक्षण, जागरूकता कार्यशाळा, डिजिटलायझेशन इ.), बीकेएस (भारतीय ज्ञान प्रणाली) सेल, अध्यापन-शिक्षण-मूल्यांकनामध्ये एआय सहाय्य/सक्षम/निर्देशित प्रणाली आणि तंत्रज्ञानाचा वापर अशा शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी रुपये १० कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

संशोधन आणि नाविन्यपूर्ण संस्कृतीच्या बळकटीकरणावर भर देत संशोधन विकास कक्ष, केंद्रीय संशोधन, उपकरणे आणि डिजिटलायझेशन सुविधा, सर्वोत्कृष्ट संशोधक आणि नवोपक्रम पुरस्कार, संशोधक आणि नवकल्पनांसाठी प्रोत्साहन, अविष्कार विजेत्यांना प्रोत्साहन आणि स्टार्ट-अप उपक्रमांना सहाय्य, नोबेल विजेत्यांची व्याख्यानमाला, बौद्धिक संपदा अधिकारांना प्रोत्साहन, ग्लोबल इनिशिएटिव्ह, मोबाईल टेक्नॉलॉजी आणि इनोव्हेशन प्रात्यक्षिक व्हॅन, क्रिटिकल आणि इमर्जिंग टेक्नॉलॉजी (प्रगत संगणन आणि सेमीकंडक्टर्स, प्रगत साहित्य आणि नॅनोटेक्नॉलॉजी, क्वांटम माहिती विज्ञान आणि तंत्रज्ञान, अनुवांशिक अभियांत्रिकी, सायबर सुरक्षा, महासागर संशोधन, शाश्वत शेती, विषाणूशास्त्र, हवामान अनुकूलता विकास, आणि कार्यक्षमता संशोधनाला प्रोत्साहन, आरोग्यसेवा, स्मार्ट शहरे, स्मार्ट गतिशीलता आणि वाहतूक विषयांवरील संशोधनाला चालना देण्यासाठी १५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. त्याचबरोबर विद्यार्थी सहाय्य आणि प्रगती उपक्रमांसाठी ५ कोटींची तरतूद करण्यात आली असून यामध्ये सिंगल विंडो सिस्टीम आणि स्टुडंट हेल्पडेस्क, लर्नर सपोर्ट सिस्टीम, समान संधी सेल, सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य, ट्रान्सजेंडर विद्यार्थ्यांसाठी सुविधा, युनिव्हर्सल ह्युमन व्हॅल्यू सेल, सुवर्ण पदके आणि मेरिट अवॉर्ड्स/स्कॉलरशिप मध्ये वाढ अशा योजनांचा समावेश आहे. माजी विद्यार्थी कनेक्ट आणि विद्यापीठ-औद्योगिक साहचर्य उपक्रमासाठी रुपये २ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीच्या उद्देश्याने उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयकरण आणि वैश्विक नागरिकत्व शिक्षणासाठी पुढाकार घेत विद्यापीठाने या वित्तीय वर्षात रुपये ३ कोटींची तरतद केली आहे. ज्यामध्ये राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विद्यार्थी समर्थन आणि लिंकेजसाठी केंद्र, परदेशी विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी आणि नावनोंदणीसाठी सिंगल विंडो सिस्टीम, रँकिंग आणि ब्रँडिंग उपक्रम, जागतिक दर्जाच्या विद्यापीठांसह सहयोग आणि संबंध (विद्यार्थी/आणि फॅकल्टी एक्सचेंज, संशोधन भागीदारी, स्टडी अब्रॉड प्रोग्राम/इंटर्नशिप, ट्विनिंग/जॉइंट/ड्युअल डिग्री प्रोग्राम, क्रेडिट ट्रान्सफर मेकॅनिझम अशा अनुषंगिक उपक्रमांचा समावेश करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे शासन (गव्हर्नंस) गुणवत्ता, सर्वसमावेशकता आणि उत्कृष्टतेला प्राधान्य देण्यासाठी विद्यापीठाने रुपये ३० कोटींची भरीव तरतूद या अर्थसंकल्पात केली आहे. विकसित भारत @ २०४७ च्या अनुषंगाने विद्यापीठाचा पुढाकार, अमृतकाळाच्या पूर्वसंध्येला नाविन्यपूर्ण कार्यक्रम, जागतिक दर्जाचे विद्यापीठ म्हणून मुंबई विद्यापीठाचा मास्टर प्लॅन, कार्बन न्यूट्रल ग्रीन कॅम्पस उपक्रम, फोर्ट, विद्यानगरी आणि इतर उपपरिसरांतील पायाभूत सुविधांचे अद्ययावतीकरण, व्हिसी फेलो, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी

कल्याणकारी उपक्रम, महिला कल्याण योजना, क्रीडा सुविधेचे ऑलिम्पिक मानकांमध्ये सुधारणा, दिव्यांग स्नेही कॅम्पस, वारसा संवर्धन, विद्यार्थी भवनाचे बांधकाम, आरोग्य केंद्राचे अपग्रेडेशन, डिजिटल उपक्रम: पेपरलेस गव्हर्नन्स, डिजिटल लायब्ररी, रेकॉर्ड/हस्तलिखितांचे डिजिटायझेशन, डेटा सेंटरचे क्लाउड बेस्ड सिस्टममध्ये अपग्रेडेशन, व्ही.सी. फेलो, सर्वोत्तम प्रशासकीय विभाग: सामान्य प्रशासन, परीक्षा, वित्त, महाविद्यालयीन कर्मचारी- शहरी आणि ग्रामीण, सर्वोत्कृष्ट सिनेट सदस्य, सर्वोत्कृष्ट विद्या परिषद सदस्य यासाठी पुरस्कार, युनिव्हर्सिटी सोशल रिस्पॉन्सिबिलिटी सेल (USRC) ज्यामध्ये शेतकरी, ज्येष्ठ नागरिक, समुदाय सहभाग, रक्तदान अशा अनुषंगिक बाबींचा समावेश असलेला सर्वसमावेशक अर्थसंकल्प अधिसभेने मंजूर केला.

अशा प्रमुख ठळक वैशिष्ट्यांवर आधारीत वित्तीय वर्ष २०२४-२०२५ चा रुपये ८५७ कोटींचा अर्थसंकल्प प्रा. सीए. रवींद्र बांबर्डेकर, प्रभारी वित्त व लेखा अधिकारी यांनी मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्राचार्य. डॉ. अजय भामरे, प्रभारी कुलसचिव प्रा. बळीराम गायकवाड, यांच्या उपस्थितीत अधिसभेच्या मान्यवर सदस्यांसमोर सादर केला. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांच्या आदेशान्वये विद्यापीठाने या वर्षीचा अर्थसंकल्प तयार करण्यासाठी विद्यापीठ उपपरिसर, विद्यापीठ विभाग व आंतरविद्याशाखा अभ्यास मंडळ, आजीवन अध्ययन व विस्तार मंडळ, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, माहिती व तंत्रज्ञान मंडळ आणि अधिष्ठाता आणि सहयोगी अधिष्ठाता या सर्वांचे सक्रीय सहभाग आणि मौलिक मार्गदर्शन लाभले.

**२०२४-२०२५ नाविन्यपूर्ण योजना/उपक्रम**

- गुणवत्ता, सर्वसमावेशकता आणि उत्कृष्टता शैक्षणिक उपक्रम १० कोटी
- संशोधन आणि नाविन्यपूर्ण संस्कृतीच्या बळकटीकरणासाठी पुढाकार १५ कोटी
- विद्यार्थी सहाय्य आणि प्रगती उपक्रम ५ कोटी
- माजी विद्यार्थी कनेक्ट आणि विद्यापीठ- औद्योगिक साहचर्य उपक्रम २ कोटी
- उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयकरण आणि वैश्विक नागरिकत्व शिक्षणासाठी पुढाकार ३ कोटी
- गुणवत्ता, सर्वसमावेशकता आणि उत्कृष्टता गव्हर्नंस उपक्रम ३० कोटी

२०२४-२०२५ या वर्षामधील नियोजित बांधकामे-

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्र- रुपये २५ कोटी
- तृतीय व चतूर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे निवासी संकूल व सामुदायिक सभागृह- रुपये २२ कोटी
- प्रा. बाळ आपटे दालन – रुपये २८ कोटी
- स्कूल ऑफ लॅंग्वेजेस इमारत (२ रा टप्पा), अवेस्ता पहलवी अभ्यास केंद्र - रुपये १४ कोटी
- आंतरराष्ट्रीय विद्यार्थी वसतिगृह (२ रा टप्पा)- रुपये २५ कोटी
- मुलींचे वसतिगृह ८ कोटी ५ लाख
- वेंगुर्ला उपपरिसराचा विकास- रुपये ५० लाख

# मुंबई विद्यापीठात ‘विद्यार्थी संवाद’ उपक्रमाची सुरुवात
## महिन्याच्या पहिल्या आणि तिसऱ्या बुधवारी कुलगुरूंचा विद्यार्थ्यांशी संवाद

मुंबई, दि. ३० मार्च: मुंबई विद्यापीठातील विविध शैक्षणिक विभाग आणि संलग्नित महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना आता थेट कुलगुरू यांच्याशी संवाद साधता येणार आहे. मुंबई विद्यापीठाने ‘कुलगुरू संवाद’ या अभिनव उपक्रमाला सुरुवात केली असून, महिन्याच्या पहिल्या आणि तिसऱ्या बुधवारी विद्यापीठात ‘विद्यार्थी संवाद’ या कार्यक्रमाचे आयोजन केले जाणार आहे. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी हे विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. विद्यार्थी संवाद उपक्रमासाठी प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे, कुलसचिव प्रा. बळीराम गायकवाड, परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालिका डॉ. पूजा रौंदळे आणि संबंधित अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

मुंबई विद्यापीठातील पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाला प्रविष्ठ असलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक व अनुषंगिक बाबींशी निगडीत प्रश्न, शंका, समस्या यांचे निरसन करण्यासाठी विद्यापीठात विद्यार्थी संवाद कार्यक्रमाचे आयोजन केले जात आहे. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता पात्रता व नावनोंदणी, गुणपत्रिका, पदवी प्रमाणपत्र यासह परीक्षा विभागाशी निगडीत बाबींचे प्राथम्याने निरसन करण्यावर भर दिला जाणार आहे.

विशेष म्हणजे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने येत्या शैक्षणिक वर्षापासून मुंबई विद्यापीठातील सर्व बिगर संलग्नित महाविद्यालयात तीन आणि चार वर्षांचे सर्व विद्याशाखेचे अभ्यासक्रम राबवले जाणार आहेत. या अनुषंगाने विद्यापीठाने ठरवून दिलेल्या सहा व्हर्टिकल (घटक) नुसार विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या विविध मेजर, मायनर, ओपन इलेक्टिव्ह, व्होकेशनल स्कील कोर्सेस, एबिलिटी एनहान्समेंट कोर्सेससह भारतीय ज्ञान प्रणाली आणि कार्यांतर्गत प्रशिक्षण अशा विविध सहा व्हर्टिकल मधील विषयांबाबतही मार्गदर्शन केले जाणार आहे.

‘विद्यार्थी संवाद’ या कार्यक्रमाचे एप्रिल महिन्याचे नियोजन हे दिनांक ०३ एप्रिल आणि १८ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ११ ते १२.३० वाजेदरम्यान मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी संकुलातील छत्रपती शिवाजी महाराज भवन (नवीन परीक्षा भवन) येथे करण्यात आले आहे. या उपक्रमात सहभागी होणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी त्यांचे ओळखपत्र सोबत आणने अनिवार्य असेल. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी विद्यापीठात तक्रार निवारण समीती कार्यरत असून विद्यार्थी विकास विभागामार्फत याचे कामकाज पाहिले जाते. विद्यार्थ्यांचे व्यापक शैक्षणिक हित लक्षात घेता विद्यापीठामार्फत लोकपाल नियुक्तीही करण्यात आली आहे.

# मुंबई विद्यापीठाचा रशियातील मास्को स्टेट विद्यापीठाशी सामंजस्य करार उच्च शिक्षणातील विविध संधीचे दालन होणार खुले



**मुंबई विद्यापीठ आणि रशियातील मास्को स्टेट विद्यापीठ यांच्यातील सामंजस्य कराराची क्षणचित्रे**

मुंबई, दि. २६ मार्चः उच्च शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयकरणाच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकत मुंबई विद्यापीठाने रशियातील मास्को स्टेट विद्यापीठाशी शैक्षणिक सामंजस्य करार केला आहे. या करारान्वये दोन्ही विद्यापीठांदरम्यान विद्यार्थी-शिक्षक आदान –प्रदान, विविध विद्याशाखातील शैक्षणिक कार्यक्रम, विविध ज्ञानशाखांत संशोधन, सह सांस्कृतिक कार्ये आणि शैक्षणिक साहित्य-संसाधन निर्मिती व हस्तांतरण अशा विविध क्षेत्रातील संधीचे दालन यानिमित्ताने खुले होणार आहे. मुंबई विद्यापीठ आणि मास्को स्टेट विद्यापीठ रशिया या उच्च शिक्षण संस्थामध्ये झालेल्या करारानुसार दोन्ही विद्यापीठातील प्राध्यापक आणि संशोधक परिषदा, कार्यशाळा आणि व्याख्यानात सहभागी होऊ शकतील तसेच अध्ययन आणि संशोधनासाठी एकत्रिक कार्य करू शकतील. याच कराराच्या अनुषंगाने स्मार्ट डिजीटल लर्निंग, सांस्कृतिक समन्वय आणि सहकार्यासाठी मुंबई विद्यापीठात व्याख्यान कक्षाच्या निर्मितीसाठी मास्को स्टेट विद्यापीठाने स्वारस्य दाखवले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना अनुभवात्मक आणि कौशल्य प्रशिक्षण, श्रेणी हस्तांतरण, दुहेरी पदवी, सह पदवी, ऑनलाईन आणि प्रत्यक्ष इंटर्नशिप, कृत्रिम बुद्धीमत्ता व इतर प्रगत ज्ञानशाखात अध्ययन व संशोधन व्हावे यासाठी मुंबई विद्यापीठाने विविध देशासोबत शैक्षणिक सामंजस्य करार केले आहेत. वैश्विक ज्ञानाच्या देवाणघेवाण प्रक्रियेमुळे विविध देशांतील शिक्षण प्रणालींमध्ये विकसित होत असलेल्या परस्परसंवादाद्वारे विद्यार्थ्यांना या कराराअंतर्गत याचा फायदा होणार असून, यामुळे सर्वोत्कृष्ट शैक्षणिक आणि संशोधन पद्धतींच्या सामायिकरणास प्रोत्साहन मिळू शकेल असा आशावाद मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी व्यक्त केला.

मुंबई विद्यापीठाच्या फोर्ट संकुलात आयोजित केलेल्या या कार्यक्रमासाठी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र. कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे, कुलसचिव प्रा. बळीराम गायकवाड, अधिष्ठाता वाणिज्य व व्यवस्थापन प्रा. कविता लघाटे, अधिष्ठाता विज्ञान व तंत्रज्ञान प्रा. शिवराम गर्जे, आंतरराष्ट्रीय संबंध आणि सामरिक अभ्यास केंद्राचे संचालक प्रा. बी. व्ही. भोसले, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय साहचर्य व विद्यार्थी सहाय्य केंद्राचे समन्वयक डॉ. सुनील पाटील, नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. सचिन लढ्ढा यांच्यासह मास्को स्टेट विद्यापीठाकडून अलेक्सी लेबेडेव्ह, संचालक, कला-पॉडगोटोव्हका, आंद्रे सेरोव उपाध्यक्ष, गॅझप्रॉमबँक, मिस्टर इगोर बोचकोव्ह, डेप्युटी व्हाईस-रेक्टर- आंतरराष्ट्रीयीकरण विभागाचे अध्यक्ष, आणि रशियाच्या मॉस्को स्टेट युनिव्हर्सिटीच्या आंतरराष्ट्रीय सहकार्य विभागाचे मिस्टर युरी माझेई हे उपस्थित होते.

## उन्हाळी सत्राच्या परीक्षा केंद्राची माहिती विद्यार्थ्यास ऑनलाईन उपलब्ध
## १ लाखापेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेशपत्रे उपलब्ध

मुंबई, दि. २० मार्च: मुंबई विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या उन्हाळी सत्राच्या परीक्षेस दिनांक २२ मार्चपासून सुरुवात होत आहे. आजपर्यंत पदवी परीक्षेचे १ लाखाहून अधिक विद्यार्थ्यांना प्रवेशपत्रे वितरित केली आहेत. त्याच बरोबर ऐनवेळेस काही परीक्षा केंद्रात बदल झाल्यास किंवा विद्यार्थ्यास त्याचे परीक्षा केंद्र तात्काळ समजण्यासाठी विद्यापीठाने ऑनलाईन प्रणाली विकसित केली आहे, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालिका डॉ. पूजा रौंदळे यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांनी त्याच्या लॉगिन मध्ये पीएनआर टाकल्यास त्याला त्याची परीक्षा, त्याचा आसन क्रमांक व परीक्षा केंद्र याची त्याला तात्काळ माहिती मिळते. तसेच परीक्षेच्या प्रवेश पत्रात काही दुरूस्ती असल्यास विद्यार्थी महाविद्यालयास संपर्क साधून सुधारित प्रवेशपत्र प्राप्त करून घेऊ शकतो. विद्यार्थ्यास त्याचे परीक्षा केंद्र व इतर माहिती विद्यापीठाच्या https://mum.digitaluniversity.ac/ या संकेतस्थळावर know your examination venue या लिंकवर मिळेल असे परीक्षा व निकाल कक्षाचे उपकुलसचिव नरेंद्र खलाने यांनी सांगितले.

---

## ‘स्मार्ट सिटी अभियाना’चा नागरिकांवर सकारात्मक परिणाम
## मुंबई, गुजरात आणि अहमदाबाद विद्यापीठांच्या संयुक्त संशोधनातील निष्कर्ष

मुंबई, दि. १९ मार्चः महाराष्ट्रातल्या पुणे, ठाणे, नाशिक आणि कल्याण-डोंबिवली या चार व गुजरातमधील सुरत, वडोदरा आणि अहमदाबाद या तीन स्मार्ट सिटींमधील नागरिकांच्या अभ्यासातून स्मार्ट सिटी अभियानाचा नागरिकांवर सकात्मक परिणाम दिसून येत असल्याचे संयुक्त संशोधनाच्या निष्कर्षातून पुढे आले आहे. तसेच नागरिकांचा लक्षणीय सकारात्मक प्रतिसाद पाहता जून २०२४ नंतरही हे अभियान सुरु ठेऊन, अधिक शहरातील नागरिकांना त्याचा लाभ मिळावा यासाठी ‘स्मार्ट सिटीज अभियाना’ चा दुसरा टप्पा सुरू करण्याची शिफारस देखील करण्यात आली. तीन विद्यापीठातील ( अल्केश दिनेश मोदी वित्तीय व व्यवस्थापन अभ्यास संस्था, मुंबई विद्यापीठ, गुजरात विद्यापीठ आणि अहमदाबाद विद्यापीठ) ६ प्राध्यापकांनी केलेल्या संयुक्त संशोधन प्रकल्पातून हे निष्कर्ष पुढे आले आहेत. आयसीएसएसआरने प्रायोजित केलेल्या ‘नागरिकांच्या दृष्टीकोनातून स्मार्ट सिटीज मिशनच्या प्रभावाचे मॅपिंग’ या संयुक्त संशोधन प्रकल्पाचे सादरीकरण ११ मार्च २०२४ रोजी मुंबई विद्यापीठात आयोजित केलेल्या ‘स्पेशल कॉल फॉर एम्पिरिकल रिसर्च प्रोजेक्ट्स’ या कार्यशाळेत करण्यात आले. अल्केश दिनेश मोदी वित्तीय व व्यवस्थापन अभ्यास संस्थेने आयोजित केलेल्या या कार्यशाळेसाठी स्मार्ट शहरातील मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रशासक, भागधारक, शिक्षणतज्ज्ञ, संशोधक आणि विद्यार्थी सहभागी झाले होते.

‘नागरिकांच्या दृष्टीकोनातून स्मार्ट सिटीज मिशनच्या प्रभावाचे मॅपिंग’ या संयुक्त संशोधन प्रकल्पासाठी २

हजाराहून अधिक उत्तरदात्यांचा अभ्यास केला गेला. उत्तरदात्यांमध्ये ज्येष्ठ नागरिक, व्यवसाय मालक, उद्योजक, शहर वास्तूविशारद, गृहिणी, दिव्यांग व्यक्ती आणि विद्यार्थी यांचा समावेश होता. या अभ्यासात स्मार्ट शहरांच्या उपक्रमांबद्दल नागरिकांच्या धारणा ८ स्मार्ट सिटी निर्देशांकावर मॅप केल्या. ज्यामध्ये स्मार्ट अर्थव्यवस्था ( नाविन्यता आणि उद्योजकता), स्मार्ट गव्हर्नन्स, स्मार्ट पर्यावरण, स्मार्ट मोबॅलिटी, स्मार्ट लिव्हींग, स्मार्ट लोकं, संस्कृती वारसा व पर्यटन आणि शाश्वत विकास लक्ष्ये यांचा समावेश होता. स्मार्ट सिटी अभियान धोरणाचा स्मार्ट शहरांच्या राहणीमान, आर्थिक क्षमता आणि शाश्वतेवर सकारात्मक परिणाम झाला असल्याचे नागरिकांच्या दृष्टिकोनातून केलेल्या या अभ्यासात उघड झाले. पुणे, ठाणे, अहमदाबाद, सुरत, कल्याण-डोंबिवली या स्मार्ट शहरांमध्ये 'स्मार्ट सिटीज अभियाना'च्या अंमलबजावणीतील काही उल्लेखनीय सामर्थ्यांवर प्रकाश टाकण्यात आला. महाराष्ट्रातील चार स्मार्ट शहरांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आणि प्रशासकांनी धोरण शिफारशींसाठी या संशोधन निष्कर्षांच्या उपयुक्ततेचे कौतुक केले.

---

## मुंबई विद्यापीठात 'महाविद्यालय कौशल्य विकास केंद्रा'ची (MKVK) स्थापना कौशल्याधारित ज्ञानार्जनाची युवकांना संधी

मुंबई, दि. १६ मार्चः व्यावसायाभिमूख आणि कौशल्याधारीत अभ्यासक्रम राबविणाऱ्या मुंबई विद्यापीठाच्या गरवारे व्यवसाय व प्रशिक्षण संस्थेत महाराष्ट्र शासन आणि मुंबई विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालय कौशल्य विकास केंद्राची (MKVK) स्थापना करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना कौशल्याधारीत प्रशिक्षण तसेच रोजगार क्षमता निर्मितीसाठी मुंबई विद्यापीठाने नुकताच जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रासोबत सामंजस्य करार केला आहे. या शैक्षणिक सामंजस्य कराराअंतर्गत गरवारे व्यवसाय व प्रशिक्षण संस्था प्रशिक्षण संस्था म्हणून भूमिका पार पाडणार आहे.

विद्यार्थ्यांना कौशल्यांनी सुसज्ज करून आणि व्यावहारिक ज्ञान देऊन त्यांच्यातील उद्योजकता व रोजगारक्षमता वाढीसाठी महाराष्ट्र कौशल्य विकास केंद्राअतर्गत १४ अत्यावश्यक कौशल्यांचे प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्टये ठरविण्यात आली आहेत. गरवारे व्यवसाय व प्रशिक्षण संस्थेमार्फत राबविण्यात लॉजिस्टिक सप्लाय चेन मॅनेजमेंट, पेंट्स टेक्नोलॉजी, इंटेरिअर डिझाईन, ट्रॅव्हल्स अँड टूर्स मॅनेजमेंट आणि रिटेल मॅनॅजमेंट अशा विविध कौशल्याधारीत आणि रोजगारक्षम अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण या संस्थेमार्फत दिले जाणार आहे. त्याचबरोबर प्लेसमेंटसाठीही सहाय्य केले जाणार आहे. हे प्रशिक्षण विनामूल्य असणार आहे. ५०० तासांच्या अवधीच्या या कौशल्याधारीत प्रशिक्षणासाठी बारावी, पदवी आणि पदव्युत्तर उत्तीर्ण विद्यार्थी नोंदणी करू शकणार असून या महिन्यांपासून हे प्रशिक्षण सुरु केले जाणार असल्याचे गरवारे व्यवसाय व प्रशिक्षण संस्थेचे संचालक डॉ. केयुरकुमार नायक यांनी सांगितले. या कौशल्य प्रशिक्षणाबाबतची अधिक माहिती गरवारे व्यवसाय व शिक्षण आणि जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रातून प्राप्त केली जाऊ शकणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

“आज भारतासह जगाला कुशल मनुष्यबळाची गरज आहे. ही गरज लक्षात घेता अधिकाअधिक युवकांना कौशल्याधारित शिक्षणाची गरज आहे. ज्ञानार्जन करताना विद्यार्थ्यांमधील कौशल्यातील दरी भरून काढण्यासाठी आणि सर्वसमावेशक वृध्दीला चालना देण्यासाठी मुंबई विद्यापीठाने हे एक महत्वपूर्ण पाऊल टाकले असून महाराष्ट्राच्या वाढीसाठी आणि समृद्धीसाठी या कराराचे महत्व अधोरेखित होणार आहे.”

**- प्रा. रवींद्र कुलकर्णी,** कुलगुरू, मुंबई विद्यापीठ

## ‘इंद्रधनुष्य’ वर मुंबई विद्यापीठाची विजयी पताका
## राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ सांस्कृतिक युवा महोत्सव ‘इंद्रधनुष्य’वर मुंबई विद्यापीठाची विजयी मोहर
## १९ पैकी तब्बल १८ वेळा विजयाचा बहुमान



**राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ सांस्कृतिक युवा महोत्सव ‘इंद्रधनुष्य’ स्पर्धेतवर वर्चस्व गाजविणारी मुंबई विद्यापीठाची चमू**

मुंबई, दि. १५ मार्चः १९ व्या राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ सांस्कृतिक युवा महोत्सव ‘इंद्रधनुष्य’ मध्ये मुंबई विद्यापीठाने बाजी मारत अव्वल स्थान पटकावले आहे. ११ ते १५ मार्च २०२४ दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर येथे आयोजित करण्यात आलेल्या या युवा महोत्सवामध्ये मुंबई विद्यापीठाची विजयी मोहर उमटली आहे. विशेष बाब म्हणजे आतापर्यंत मुंबई विद्यापीठाने स्पर्धेच्या १९ वर्षाच्या कारकिर्दीमध्ये तब्बल १८ वेळा हा चषक आपल्याकडे राखण्याचा बहुमान मिळविला आहे. संगीत, नृत्य, नाट्य, वांङ्मय आणि ललित कला या गटांतील स्पर्धांमध्ये विजयी सलामी देत सांस्कृतिक युवा महोत्सवामध्ये मुंबई विद्यापीठाने १११ गुणांची कमाई करत सर्वसाधारण विजेतेपद मिळवून अव्वल स्थान पटकावले आहे. द्वितीय क्रमांक प्राप्त झालेल्या विद्यापीठास ६० गुण मिळाले आहेत. या राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ सांस्कृतिक युवा महोत्सव ‘इंद्रधनुष्य’मध्ये राज्यातील २३ विद्यापीठे सहभागी झाली होती.

मुंबई विद्यापीठाच्या परीक्षेत्रातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भारतीय शास्त्रीय तालवाद्य, पाश्चिमात्य एकल गायन, शास्त्रीय गायन, सुगम संगीत, मूकाभिनय, मातीकाम, व्यंगचित्र या विभागामध्ये सुवर्ण पदक मिळवून निर्विवाद वर्चस्व मिळविले आहे. यासोबत पाश्चिमात्य समूह गायन, लोकनाट्यवृंद, नाट्यसंगीत, नकला आणि प्रश्नमंजूषा या स्पर्धांमध्ये रौप्य पदक प्राप्त केले. तर भारतीय समुह गीत, शास्त्रीय नृत्य, एकांकिका, भित्तीपत्रके, रांगोळी आणि चित्रकला या स्पर्धांमध्ये कांस्य पदक मिळाले.

पाच विभागापैकी नृत्य आणि नाट्य या विभागात सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त केले आहे. कुमारी मोहक मटकर आणि सुधांशू सोमण या विद्यार्थ्यांनी विविध सहा स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन सर्वात जास्त बक्षिस मिळवून गोल्डन गर्ल आणि गोल्डन बॉयचा किताब मिळवला. विद्यापीठाच्या ४२ विद्यार्थ्यांच्या संघानी या सर्व कलाप्रकारात सहभाग घेतला होता.

या स्पर्धेसाठी मार्गदर्शक म्हणून मुंबई विद्यापीठाचे राष्ट्रीय स्तरावरील विजेते व माजी विद्यार्थी विजय जाधव, साहिल जोशी, अभिजीत मोहिते, रोहन कोतेकर, विलास रहाटे, केशर चोपडेकर, महेश कापरेकर, सागर चव्हाण, आशीष पवार, अमित घरत, अमन सिंह आणि अमोल बावकर या सर्वांचे सहकार्य लाभले असून विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सुनिल पाटील आणि सांस्कृतिक समन्वयक निलेश सावे यांनी यशस्वीरित्या या स्पर्धेचे नियोजन केले होते. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र-कुलगुरू प्राचार्य. डॉ. अजय भामरे, कुलसचिव प्रा. बळीराम गायकवाड यांनी विजयी चमूचे अभिनंदन करुन भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

---

## मुंबई विद्यापीठाच्या आयडीयाथॉन १.० ची घोषणा
## विद्यापीठाच्या एमयु- आयडियाज् इन्क्युबेशन सेंटरचा उपक्रम
## नवकल्पनांचे होणार स्टार्टअपमध्ये रुपांतर




मुंबई, दि. १४ मार्चः मुंबई विद्यापीठाने नवकल्पना व नवसंशोधनांना स्टार्टअपमध्ये रुपांतर करण्यासाठी 'आयडीयाथॉन १.०' ची घोषणा केली आहे. मुंबई विद्यापीठाच्या एमयु- आयडियाज् इन्क्युबेशन सेंटरने हाती घेतलेल्या या उपक्रमामुळे नवउद्योजकांना मदत व अर्थसहाय्य केले जाणार असून त्यांच्या प्रकल्पांना मूर्त रुप दिले जाणार आहे. 'आयडीथॉन १.०' च्या माध्यमातून नवउद्योजकांना त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांचे व्यावसायिकदृष्ट्या व्यवहार्य उपक्रमांमध्ये रुपांतर करण्यास प्रोत्साहन मिळणार असल्याचे मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू

प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी 'आयडीयाथॉन १.०' च्या लाँचिंगच्या वेळी सांगितले. मुंबई विद्यापीठात २०१९ पासून एमयु- आयडियाज् इन्क्युबेशन सेंटर स्थापन करण्यात आले असून या केंद्राच्या माध्यमातून आतापर्यंत विविध नव प्रतिभावंताच्या संकल्पनांना नवउद्योगांमध्ये रुपांतर करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या या इन्क्युबेशन सेंटरला महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटीच्या माध्यमातून रुपये ५ कोटीचे अनुदान मंजूर करण्यात आलेले असून विद्यापीठाच्या कलिना संकुलातील ग्रीन टेक्नोलॉजी इमारतीमध्ये हे इन्क्युबेशन सेंटर कार्यान्वित करण्यात आले असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

'आयडीथॉन १.०' या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थी, संशोधक आणि नागरिकांना त्यांच्या नवकल्पनांच्या सादरीकरणासाठी विद्यापीठाने मोठी संधी उपलब्ध करून दिली आहे. 'आयडीथॉन १.०' मध्ये सहभागी होण्यासाठी https://tinyurl.com/MyIdeathon या लिंकवर अर्ज सादर केले जाऊ शकतात. या स्पर्धेमध्ये प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची इंडस्ट्रीमधील तज्ज्ञांच्या माध्यमातून छाननी केली जाणार असून विजेत्यांना रोख रक्कम, पारितोषिक आणि एका वर्षाचे इन्क्युबेशनचे सहाय्य मिळणार आहे. या स्पर्धेसाठी वयोगट आणि शैक्षणिक पार्श्वभूमीची कोणतीही अट नसून सर्वच क्षेत्रातील नवोदितांसाठी ही स्पर्धा खुली असणार असल्याचे मुंबई विद्यापीठाचे नवोपक्रम, नवसंशोधन आणि साहचर्य मंडळाचे नवनियुक्त संचालक डॉ. सचिन लढ्ढा यांनी सांगितले.

---

## आंतरराष्ट्रीय अन्वेषण संशोधन स्पर्धेवर मुंबई विद्यापीठाची विजयी मोहर

## पहिल्याच आंतरराष्ट्रीय अन्वेषण संशोधन स्पर्धेत सर्वसाधारण सुवर्ण पदक

## आरोग्य विज्ञान आणि सामाजिक शास्त्रे गटात प्रथम क्रमांक, शेती गटात द्वितीय क्रमांक

मुंबई, दि. १२ मार्च: भारतीय विद्यापीठ संघ (एआययु) आणि मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई विद्यापीठात पहिल्यांदाच आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय अन्वेषण संशोधन महोत्सवात मुंबई विद्यापीठाने संशोधनाच्या क्षेत्रात दर्जेदार कामगिरी करत सर्वसाधारण सुवर्ण पदक प्राप्त करुन स्पर्धेवर विजयी मोहर उमटवली आहे. तसेच आरोग्य विज्ञान आणि सामाजिक शास्त्रे या गटात विद्यापीठास प्रथम क्रमांक तर शेती गटात द्वितीय क्रमांक मिळाले आहे. आरोग्य विज्ञान या गटात मानस महाले या विद्यार्थ्यांने सादर केलेल्या 'मास्क्ड लँग्वेज मॉडेल आर फ्रेगमेंट बेस्ड ड्रग डिझायनर' या प्रकल्पास प्रथम क्रमांक, सामाजिक शास्त्रे गटात गौरव पांडे, ऋतूजा जगतकर, स्नेहा कुमारी आणि गिन्नी केवलरामानी यांनी सादर केलेल्या 'आंचल: अ रियुज्येबल, इको फ्रेंडली स्लीपिंग बॅग फॉर बॅटलींग न्युनॅटल हायपोथेरमिया इन रुरल एरिया' या प्रकल्पास प्रथम क्रमांक आणि शेती गटात ओम यादव या विद्यार्थ्यांने सादर केलेल्या 'सॅकोपीट टीएमः ए नोवेल पॉटींग मीडिया' या प्रकल्पास द्वितीय क्रमांक मिळाले आहे.

मुंबई विद्यापीठास पहिल्यांदाच या आंतरराष्ट्रीय संशोधन महोत्सवाच्या आयोजनाचे यजमानपद मिळाले. ११ आणि १२ मार्च २०२४ या दोन दिवसात या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. देशभरातील २८ विद्यापीठे या संशोधन महोत्सवात सहभागी झाली होती.




आंतरराष्ट्रीय अन्वेषण संशोधन स्पर्धेत
समग्र सुवर्ण पदक प्राप्त करणारी चमू




आंतरराष्ट्रीय अन्वेषण संशोधन स्पर्धेवर विजयी मोहर
उमटवणारी मुंबई विद्यापीठाची चमू

विद्यापीठातील विद्यार्थ्यांमधील नवकल्पकता, वैज्ञानिक दृष्टिकोन ओळखून त्यांना संधीची उपलब्धता करून देणे, विद्यार्थ्यांसह शिक्षकांमधील संशोधनवृत्तीला बळ देऊन राज्य आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये अधिकाधिक सहभागिता वाढविणे अशा महत्वाकांक्षी उद्देश्यांसह विद्यार्थी संशोधन महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. यापूर्वी राष्ट्रीय स्तरावर आंतरविद्यापीठीय राष्ट्रीय अन्वेषण संशोधन स्पर्धा म्हणून या संशोधन महोत्सवाचे आयोजन केले जात होते. यावर्षी पहिल्यांदाच या संशोधन स्पर्धेची व्याप्ती वाढवून आंतरराष्ट्रीय विद्यार्थी संशोधन महोत्सव म्हणून आयोजन करण्यात आले. या संशोधन महोत्सवात शेती; मुलभूत शास्त्रे; अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान; आरोग्य विज्ञान आणि अनुषंगिक विषय; सामाजिक शास्त्रे, मानव्यविज्ञान, वाणिज्य, विधी; आणि आंतरविद्याशाखीय संशोधन अशा सहा वर्गवारीतून एकूण ७० प्रकल्पांचे सादरीकरण केले गेले असून सादरीकरणासाठी एकूण १६७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

दोन दिवस चाललेल्या या स्पर्धेचे निकाल जाहिर करण्यात आले असून मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. यावेळी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, भारतीय विद्यापीठ संघाचे संयुक्त सचिव (संशोधन) डॉ. अमरेंद्र पानी, सहाय्यक संचालक ( संशोधन) डॉ. उषा राय नेगी, मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे आणि विद्यार्थी विकास विभागाचे संचालक तथा अन्वेषण, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी संशोधन महोत्सवाचे निमंत्रक डॉ. सुनिल पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

अन्वेषण संशोधन महोत्सवातून पुढे येणाऱ्या प्रतिभावंताच्या संशोधनवृत्तीला चालना देण्यासाठी स्टार्ट-अप इंडियाच्या माध्यमातून मोठे पाठबळ मिळू शकेल असा आशावाद व्यक्त करत या सर्व नव प्रतिभावंतांनी उद्योन्मुख क्षेत्रातल्या संशोधनासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहन मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी केले. मुंबई विद्यापीठाने अविष्कार आणि अन्वेषण संशोधन महोत्सवातून पुढे येणाऱ्या नव संशोधकांना आणि प्रतिभावंतांना मदत व अर्थसहाय्य करण्यासाठी विद्यापीठाने पाऊल उचलले असून इन्क्युबेशन सेंटरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या या प्रकल्पांना मूर्त रुप दिले जाणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

**स्पर्धेचे निकाल:**

**सर्वसाधारण सुवर्ण पदक:** मुंबई विद्यापीठ

**शेती:**

**प्रथम क्रमांक:** एसआरएम इन्स्टीट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्नोलॉजी, तामिळनाडू

**द्वितीय क्रमांक:** मुंबई विद्यापीठ

**तृतीय क्रमांक:** शारदा विद्यापीठ, उत्तर प्रदेश

**मुलभूत शास्त्रे:**

**प्रथम क्रमांक:** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**द्वितीय क्रमांक:** शिवाजी विद्यापीठ

**तृतीय क्रमांक:** जादवपूर विद्यापीठ, कोलकाता

**अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान:**

**प्रथम क्रमांक:** जादवपूर विद्यापीठ, कोलकाता

**द्वितीय क्रमांक:** शारदा विद्यापीठ, उत्तर प्रदेश

**तृतीय क्रमांक:** डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटी, कोल्हापूर

**आरोग्य विज्ञान:**

**प्रथम क्रमांक:** मुंबई विद्यापीठ

**द्वितीय क्रमांक:** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**तृतीय क्रमांक:** एसजीटी विद्यापीठ हरयाणा

**सामाजिक शास्त्रे:**

**प्रथम क्रमांक:** मुंबई विद्यापीठ

**द्वितीय क्रमांक:** अन्नामलाई विद्यापीठ, तामिळनाडू

**तृतीय क्रमांक:** जादवपूर विद्यापीठ, कोलकाता

**आंतरविद्याशाखीय**

**प्रथम क्रमांक:** अन्नामलाई विद्यापीठ, तामिळनाडू

**द्वितीय क्रमांक:** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**तृतीय क्रमांक:** अविनाशलिंगम इन्स्टीट्यूट फॉर होम सायन्स अँड हायर एज्युकेशन, तामिळनाडू

## पत्रकारिता विभागाचा पदवी वितरण समारंभ




मुंबई विद्यापीठाच्या संज्ञापन आणि पत्रकारिता विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या पदवी वितरण समारंभाची क्षणचित्रे




मुंबई विद्यापीठाच्या संज्ञापन आणि पत्रकारिता विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या पदवी वितरण समारंभाची क्षणचित्रे

मुंबई, दि. १२ मार्च: मुंबई विद्यापीठाच्या संज्ञापन आणि पत्रकारिता विभागाच्या वतीने ४० विद्यार्थ्यांना व भावी पत्रकारांना पदवी प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. तर ४ पीएचडी विद्यार्थ्यांनाही याप्रसंगी पदवी देऊन गौरवण्यात आले. हे पदवी प्रमाणपत्राचे वितरण चित्रपट व दूरचित्रवाणी कार्यक्रमाचे निर्माते श्री. नितीन वैद्य, जय महाराष्ट्र वृत्तवाहिनीचे संपादक श्री. प्रसाद काथे व पत्रकार अलका धुपकर यांच्या हस्ते करण्यात आले.



**मुंबई विद्यापीठाच्या संज्ञापन आणि पत्रकारिता विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या पदवी वितरण समारंभाची क्षणचित्रे**

याप्रसंगी मुंबई विद्यापीठाच्या संज्ञापन आणि पत्रकारिता विभागाचे विभागप्रमुख डॉ. सुंदर राजदीप हे उपस्थित होते. हा कार्यक्रम मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी संकुलातील फिरोजशहा मेहता सभागृहात पार पडला.

### ४ पीएचडीधारक विद्यार्थी

या पदवी वितरण कार्यक्रमात विभागाचे प्राध्यापक डॉ. सागर भालेराव, राज्य निवडणूक आयोगाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. जगदीश मोरे, डॉ. मयूर पारीख व डॉ. अमरीन मोगर या चार विद्यार्थ्यांनी पत्रकारिता या विषयात पीएचडी प्राप्त केली आहे. या पीएचडीधारक चारही विद्यार्थ्यांनाही या कार्यक्रमात पदवी प्रमाणपत्र त्यांचा सत्कार करण्यात आला.

### ४ विद्यार्थ्यांना गुणवंत पुरस्कार प्रदान

याच पदवी वितरण कार्यक्रमात विभागातील दिव्यांशी गौर, प्रणव केळुसकर, उन्नत सांगळे व इबतीसाम शेख या चार विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्षातील कामगिरीबद्दल गुणवंत विद्यार्थी पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

याप्रसंगी चित्रपट निर्माते नितीन वैद्य म्हणाले, पत्रकारांनी समाजातील शेवटच्या व्यक्तीच्या हक्कासाठी लढले पाहिजे. माध्यमे हि दिवसेंदिवस विकसित होत आहेत त्यासाठी पत्रकारांनी नेहमी अपडेट राहायला हवे.

जय महाराष्ट्र वृत्तवाहिनीचे संपादक प्रसाद काथे यांनी टीव्ही न्यूज रूमची मौल्यवान माहिती दिली. त्यांनी भावी पत्रकारासाठी भाषेचे महत्त्व स्पष्ट करून भाषा हा पत्रकारितेतील सर्वात महत्त्वाचा घटक आहे असे ते म्हणाले. इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या संदर्भात ते म्हणाले की, पत्रकाराने काम करताना त्याच्या ऑन-स्क्रीन दिसण्याचाही विचार करणे आवश्यक आहे.

पत्रकार अलका धुपकर सामाजिक प्रश्नांवर बोलताना म्हणाल्या, महिलांनी त्यांच्या हक्कांसाठी उभे राहिले पाहिजे.

विभागप्रमुख प्रा.डॉ सुंदर राजदीप यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले. ते म्हणाले, "मुंबई विद्यापीठाचा विभाग आता सर्वोच्च प्रगतीकडे वाटचाल करत आहे. विविध उद्योगांना आता या विभागासोबत काम करण्यात रस आहे. या विभागातील विद्यार्थी आता विविध संस्थांमध्ये स्वत:चे स्थान निर्माण करत आहेत. या संस्थेचे विद्यार्थी ही विभागाची संपत्ती आहे असे ते म्हणाले.

या कार्यक्रमाला सहायक प्राध्यापक डॉ.सागर

भालेराव व सहायक प्राध्यापक रजत खामकर उपस्थित होते.

हा विभाग दोन पूर्णवेळ कार्यक्रम चालवतो एक म्हणजे मास्टर ऑफ जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन आणि दुसरा मास्टर ऑफ जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन इन स्ट्रॅटेजिक आणि इंटिग्रेटेड कम्युनिकेशन.

## मुंबई विद्यापीठात आंतरराष्ट्रीय अन्वेषण संशोधन महोत्सवाचे आयोजन विद्यापीठास मिळाले आंतरराष्ट्रीय विद्यार्थी संशोधन महोत्सवाचे पहिले यजमानपद

मुंबई, दि. ११ मार्च: भारतीय विद्यापीठ संघ (एआययु) आणि मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई विद्यापीठात पहिल्यांदाच आंतरराष्ट्रीय अन्वेषण संशोधन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. ११ आणि १२ मार्च २०२४ या दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय विद्यार्थी संशोधन महोत्सवाच्या आयोजनाचे पहिले यजमानपद मुंबई विद्यापीठास मिळाले आहे. देशभरातील २८ विद्यापीठे या संशोधन महोत्सवात सहभागी झाली आहेत. विद्यापीठातील विद्यार्थ्यांमधील नवकल्पकता, वैज्ञानिक दृष्टिकोन ओळखून त्यांना संधीची उपलब्धता करून देणे, विद्यार्थ्यांसह शिक्षकांमधील संशोधनवृत्तीला बळ देऊन राज्य आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये अधिकाधिक सहभागिता वाढविणे अशा महत्वाकांक्षी उद्देश्यांसह विद्यार्थी संशोधन महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. यापूर्वी राष्ट्रीय स्तरावर आंतरविद्यापीठीय राष्ट्रीय अन्वेषण संशोधन स्पर्धा म्हणून या संशोधन महोत्सवाचे आयोजन केले जात होते. यावर्षी पहिल्यांदाच या संशोधन स्पर्धेची व्याप्ती वाढवून आंतरराष्ट्रीय विद्यार्थी संशोधन महोत्सव म्हणून आयोजन करण्यात येत आहे.

दोन दिवस चालणाऱ्या या संशोधन महोत्सवात शेती; मुलभूत शास्त्रे; अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान; आरोग्य विज्ञान आणि अनुषंगिक विषय; सामाजिक शास्त्रे, मानव्यविज्ञान, वाणिज्य, विधी; आणि आंतरविद्याशाखीय संशोधन अशा सहा वर्गवारीतून एकूण ७० प्रकल्पांचे सादरीकरण केले जाणार आहे. या संशोधन स्पर्धेत क्षेत्रनिहाय पूर्व क्षेत्रातून ६, पश्चिम १८, दक्षिण १८, उत्तर १८ आणि मध्य १० अशा पाच क्षेत्रातून एकूण ७० प्रकल्प प्राप्त झाले असून सादरीकरणासाठी एकूण १६७ विद्यार्थी सहभागी झाली आहेत.

मुंबई विद्यापीठाच्या ग्रीन टेक्नोलॉजी सभागृहात आज या संशोधन महोत्सवाचे उदघाटन पार पडले. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. रवींद्र कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या या कार्यक्रमासाठी भारतीय विद्यापीठ संघाचे संयुक्त सचिव (संशोधन) डॉ. अमरेंद्र पानी, सहाय्यक संचालक ( संशोधन) डॉ. उषा राय नेगी, मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे आणि विद्यार्थी विकास विभागाचे संचालक तथा अन्वेषण, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी संशोधन महोत्सवाचे निमंत्रक डॉ. सुनिल पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थित संशोधकांना मार्गदर्शन करताना कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी म्हणाले की, मुंबई विद्यापीठात विविध ज्ञानशाखांत महत्वपूर्ण संशोधन केले जात आहे. उद्योन्मुख क्षेत्रातील संशोधनासाठी विद्यापीठ प्रयत्नशील असून यासाठी विविध शिखर संस्थाचे अर्थसहाय्यही लाभत आहे. भारत संशोधनाच्या क्षेत्रात आगेकुच करत

असून नॅशनल सेमिकंडक्टर मिशन, नॅशनल क्वांटम मिशन, एआय मिशन यासारख्या आपल्या देशाच्या भविष्यातील ध्येयांबद्दल त्यांनी उपस्थितांना माहिती दिली. तसेच भारतीय अर्थव्यवस्था आणि संस्कृती यांचे सामर्थ्य त्यांनी यावेळी अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. अमरेंद्र पानी यांनी त्यांच्या भाषणातून कल्पकता आणि संशोधनावर प्रकाश टाकला. आर्थिकदृष्ट्या समाजाला उपयोगी पडेल अशा नावीन्यपूर्ण संशोधनाची गरज त्यांनी यावेळी व्यक्त केली. तसेच निसर्गाशी नाते जोडण्याची आणि निसर्गातील रहस्ये समजून घेण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सुनिल पाटील यांनी या दोन दिवस चालणाऱ्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थी संशोधन महोत्सवाची संकल्पना आणि पार्श्वभूमी विशद केली.

---

## मुंबई विद्यापीठात महिला दिन साजरा




**जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने विद्यापीठीय सहकारी भगिनींच्या सन्मानार्थ विद्यानगरी परिसरात आयोजित केलेल्या महिला दिन कार्यक्रमाची क्षणचित्रे**

मुंबई, दि. ०९ मार्च: जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने विद्यापीठीय सहकारी भगिनींच्या सन्मानार्थ विद्यानगरी परिसरात मुंबई विद्यापीठात महिला दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालिका डॉ.पूजा रौंदळे होत्या.

नवनियुक्त संचालिका डॉ.पूजा रौंदळे यांनी मनोगत व्यक्त करताना महिला संबंधित माहिती व त्यांच्यासाठी विविध उपक्रम राबविण्याचा मानस व्यक्त करून उपस्थित महिलांना शुभेच्छा दिल्या. उपस्थित शिक्षकांनी कविता सादर करून समारंभाच्या आयोजनाबद्दल विद्यापीठीय पुरुष वर्गाचे विशेष आभार मानले. तद्नंतर जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने केक कापून आनंद व्यक्त केला. यानंतर महिलांनी संगीत खुर्चीच्या खेळामध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

समारंभाची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली. मा.संचालिका यांना अयोध्या येथील श्री राममंदिराची प्रतिकृती व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात



**जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने विद्यापीठीय सहकारी भगिनींच्या सन्मानार्थ विद्यानगरी परिसरात आयोजित केलेल्या महिला दिन कार्यक्रमाची क्षणचित्रे**



जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने विद्यापीठीय सहकारी भगिनींच्या सन्मानार्थ विद्यानगरी परिसरात आयोजित केलेल्या महिला दिन कार्यक्रमाची क्षणचित्रे

आले. त्याचबरोबर उपस्थित शिक्षक, महिला सहाय्यक कुलसचिव आणि विद्यापीठात विशेष सेवा बजावणाऱ्या परिचारिका व क्रीडा क्षेत्रात कामगिरी केलेल्या भगिनींचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समाधान शेळके, तर समारंभाची प्रस्तावना व आभार संदीप कहाणे यांनी पार पाडली. सदर समारंभास परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या नवनिर्वाचित संचालिका डॉ.पूजा रौंदळे यांच्या प्रमुख उपस्थितीसह २०० पेक्षा अधिक सहकारी बंधू-भगिनींनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.

---

## समृद्ध व वैभवशाली पारसी- झोरास्ट्रीयन संस्कृतीचा वैज्ञानिक दृष्टिकोनातून अभ्यास व्हावा: केंद्रीय मंत्री स्मृती इराणी
## मुंबई विद्यापीठात अवेस्ता पहलवी अभ्यास केंद्राच्या इमारतीचा भूमीपूजन सोहळा संपन्न




मुंबई विद्यापीठात आयोजित केलेल्या अवेस्ता पहलवी अभ्यास केंद्राच्या इमारतीचा भूमीपूजन सोहळ्याची क्षणचित्रे



मुंबई विद्यापीठात आयोजित केलेल्या अवेस्ता पहलवी अभ्यास केंद्राच्या इमारतीचा भूमीपूजन सोहळ्याची क्षणचित्रे

मुंबई, दि. ०५ मार्चः प्राचीन, समृद्ध आणि वैभवशाली पारसी- झोरास्ट्रीयन संस्कृतीच्या अध्ययन व संशोधनासाठी मुंबई विद्यापीठाने घेतलेला पुढाकार हा अत्यंत स्तूत्य उपक्रम असून, अवेस्ता पहलवीच्या समृद्ध वारस्याचे जतन आणि संवर्धन त्याचबरोबर या भाषेतील उपलब्ध शिलालेख, हस्तलिखिते आणि दस्तऐवजांच्या माध्यमातून या संस्कृतीचा वैज्ञानिक दृष्टिकोनातून अभ्यास व्हावा असे मत केंद्रीय महिला व बाल विकास आणि अल्पसंख्याक कार्य मंत्री श्रीमती स्मृती इराणी यांनी व्यक्त केले. अवेस्ता पहलवी या प्राचीन, दूर्मिळ आणि ऐतिहासिक



मुंबई विद्यापीठात आयोजित केलेल्या अवेस्ता पहलवी अभ्यास केंद्राच्या इमारतीचा भूमीपूजन सोहळ्याची क्षणचित्रे



मुंबई विद्यापीठात आयोजित केलेल्या अवेस्ता पहलवी अभ्यास केंद्राच्या इमारतीचा भूमीपूजन सोहळ्याची क्षणचित्रे

वारसा लाभलेल्या या भाषेतील दस्तऐवजांच्या माध्यमातून खगोलशास्त्र आणि शल्यचिकित्सा अनुषंगिक विषयांवर शैक्षणिक संस्थांनी वैज्ञानिक दृष्टिकोनातून प्रकाश टाकावा असेही त्यांनी यावेळी सांगितले. मुंबई विद्यापीठात या शैक्षणिक वर्षापासून सुरु होत असलेल्या अवेस्ता पहलवी अभ्यास केंद्राच्या प्रस्तावित इमारतीच्या भूमीपूजन सोहळ्यात प्रमुख पाहुण्या म्हणून त्या उपस्थितांशी संवाद साधत होत्या. कलिना संकुलातील ग्रीन टेक्नॉलॉजी सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री. चंद्रकांत दादा पाटील, उदवाडाचे प्रधान पुजारी वडा दस्तूरजी खुर्शेद दस्तूर, गोदरेज इंडस्ट्रीज लिमिटेडचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक नादिर बुर्जोरजी गोदरेज, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकास चंद्र रस्तोगी, केंद्रीय अल्पसंख्यांक कार्य मंत्रालयाचे संयुक्त सचिव जितेंद्र सिंह राजे, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे आणि प्रभारी कुलसचिव डॉ. बळीराम गायकवाड यांच्यासह पारसी समुदायातील नागरिक आणि मान्यवर मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

अवेस्ता पहलवी या समृद्ध आणि वैभवशाली झोरास्ट्रीयन संस्कृतीच्या अभ्यासाबरोबरच पारसी शौर्यगाथा आणि वीरता यांवरही शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून अभ्यास व्हावा. अवेस्ता पहलवी या भाषेचे संस्कृत भाषेशी असलेले साधर्म्य लक्षात घेता या ऐतिहासिक आणि गौरवशाली भाषेच्या परंपरेच्या अभ्यासाची व्याप्ती वाढविण्यासाठी विद्यापीठाने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर शैक्षणिक सामंजस्य करावे असेही त्यांनी यावेळी सांगितले.

भाषा हा समाजाचा मूलभूत आधार आहे. भाषा आणि शिक्षण फक्त ज्ञानदानाचे काम करीत नाहीत. तर चांगला आणि वाईट मार्ग कोणता हे सुद्धा दाखवितात. मुंबईमध्ये पारसी समुदाय मोठा आहे, त्यामुळे मुंबई विद्यापीठातील अवेस्ता पहलवी अभ्यास केंद्र हे महत्वपूर्ण ठरणार आहे. या अभ्यास केंद्राच्या स्थापनेसाठी केंद्रीय अल्पसंख्याक कार्य मंत्रालयाने जवळपास १२ कोटी रुपयांचे आर्थिक सहाय्य केले आहे. परंतु याव्यतिरिक्त आवश्यकता भासल्यास महाराष्ट्र शासनाकडूनही या केंद्रासाठी सर्वोतपरी आर्थिक सहाय्य केले जाणार असल्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री. चंद्रकांत दादा पाटील यांनी सांगितले. तसेच वर्षभरात या अभ्यास केंद्राची स्वतंत्र इमारत कलिना संकुलात उभी

करण्यासाठी प्रयत्न केले जातील असेही त्यांनी यावेळी सांगितले.

वैश्विक स्तरावर भारतीय संस्कृतीचा प्रचार-प्रसार, पारसी संस्कृती आणि भारतीय सांस्कृतिक परंपरा आणि आंतरराष्ट्रीय सहयोगाला प्रोत्साहन देण्याच्या व्यापक दृष्टिकोनातून मुंबई विद्यापीठात या केंद्राची स्थापना केली जात असल्याचे मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी सांगितले. तसेच या केंद्राच्या माध्यमातून झोरास्ट्रीयन संस्कृती, भारताच्या विकासात पारसी समुदायाचे योगदान, भाषिक वैशिष्ट्यांचे दस्तऐवजीकरण आणि अवेस्ता पहलवीचे भारतीय सांस्कृतिक विविधतेतील योगदानावर अभ्यास आणि संशोधन केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. अवेस्ता पहलवीच्या समृद्ध वारस्याचे जतन आणि संवर्धन, झोरास्ट्रीयन पारसी संस्कृती यावर अभ्यास करण्यासाठी नुकतेच टोरँटो विद्यापीठाने या अभ्यास केंद्रासोबत सामंजस्य करण्याचे स्वारस्य दाखवले असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

या शैक्षणिक वर्षापासून मुंबई विद्यापीठात अवेस्ता पहलवी अभ्यास केंद्राची स्थापना केली जाणार असून स्कूल ऑफ लँग्वेजेसच्या माध्यमातून हे अभ्यास केंद्र कार्यान्वित केले जाणार आहे. नुकतेच नवी दिल्लीत मुंबई विद्यापीठ आणि केंद्रीय अल्पसंख्याक कार्य मंत्रालय यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला असून या केंद्रासाठी सुमारे १२ कोटीचे आर्थिक पाठबळ लाभले आहे. या निधीतून या अभ्यास केंद्रासाठी लँग्वेज लॅब, मल्टीमीडिया स्टुडिओ आणि अनुषंगिक पायाभूत सुविधा तयार केल्या जाणार आहेत.

**यावर होणार अभ्यासः**

अवेस्ता पहलवी व्याकरण आणि शब्दसंग्रह, साहित्य, ऐतिहासिक पार्श्वभूमी, लिपी आणि लेखन प्रणाली, भाषांतर आणि फिलोलॉजिकल विश्लेषण, शब्दार्थ आणि शब्दकोश, प्राचीन इराणी इतिहास आणि सभ्यता, अवेस्ता पहलवी एपिग्राफी आणि पॅलेग्राफी, शिलालेख आणि हस्तलिखिते अशा अनुषंगिक विषयांवर सखोल अध्ययन आणि संशोधन केले जाणार आहे.

---

## जागतिक युवा महोत्सवात मुंबई विद्यापीठाचे प्रतिनिधित्व
## रशिया फेडरेशनद्वारे जगातील सर्वात मोठ्या युवा महोत्सवाचे आयोजन
## १८८ देशातील सुमारे १० हजाराहून अधिक प्रतिनिधी सहभागी

मुंबई, दि. ०१ मार्चः रशिया फेडरेशनद्वारे दिनांक ०१ मार्च ते ०७ मार्च दरम्यान रशियातील सोची येथे आयोजीत होत असलेल्या जगातील सर्वात मोठ्या जागतिक युवा महोत्सवात मुंबई विद्यापीठाचे प्रतिनिधी सहभागी झाले आहेत. जगभरातील १८८ देशातील १० हजाराहून अधिक रशियन आणि परदेशी युवा संशोधकांसह माध्यम, व्यापार, आंतरराष्ट्रीय सहकार्य, संस्कृती, विज्ञान, शिक्षण आणि क्रीडा यासह विविध क्षेत्रातील मान्यवर या जागतिक युवा महोत्सवात सहभागी झाले आहेत. या महोत्सवात भारतातर्फे सहभागी झालेल्या ३६० जणांच्या शिष्टमंडळामध्ये मुंबई विद्यापीठातील युवा संशोधक सहभागी झाले आहेत. यामध्ये आंतरराष्ट्रीय संबंध आणि सामरिक अध्ययन केंद्रातील सहाय्यक प्राध्यापक भूषण ठाकरे, सेंटर फॉर युरोशियन स्टडीजमधील संशोधक



जागतिक युवा महोत्सवात मुंबई विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणारी चमू

ऋतूजा राऊत, दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. शिप्रा वासुदेव यांच्यासह आंतरराष्ट्रीय संबंध आणि सामरिक अध्ययन केंद्रातील श्रेयस खोपकर आणि इशिका गर्ग यांचा या शिष्टमंडळात समावेश आहे. या युवा महोत्सवात आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमात मुंबई विद्यापीठाच्या वतीने हे संशोधक प्रतिनिधीत्व करणार आहेत.

या महोत्सवात जागतिक युवा महोत्सवात जागतिक अर्थव्यवस्था, हवामान बदल, सांस्कृतिक बदल, डिप्लोमसी आणि युवा मंच अशा विविध विषयांवर विविध मान्यवरांचे व्याख्यान, परिषदा, कार्यशाळा आणि क्षेत्रभेटींचे आयोजन करण्यात आले आहे. भारतीय शिष्टमंडळातील प्रतिनिधी सेंट पीटर्सबर्ग विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या सहकार्याने शाश्वत जीवनाला चालना देण्यासाठी पथनाट्य सादर करणार आहेत.

## मुंबई विद्यापीठाच्या उन्हाळी सत्राच्या २९९ परीक्षेच्या तारखा जाहीर

मुंबई, दि. ०१ मार्चः मुंबई विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या उन्हाळी सत्राच्या २९९ परीक्षेच्या तारखा जाहीर केल्या आहेत. उन्हाळी सत्राच्या या परीक्षा मार्चपासून सुरुवात होत आहेत. या उन्हाळी सत्र परीक्षेला २ लाखापेक्षा जास्त विद्यार्थी बसणार आहेत. या परीक्षेच्या तारखेसोबतच सत्र ६ च्या परीक्षेचे वेळापत्रकही संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहेत.

यातील २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाच्या तृतीय वर्ष बीकॉम सत्र ६ ची परीक्षा २२ मार्च तर तृतीय वर्ष बीए व बीएस्सी सत्र ६ च्या परीक्षा ३ एप्रिल, बीए एमएमसी सत्र ६ ची परीक्षा १६ एप्रिल व

बीकॉम स्वयंअर्थसहाय्य अभ्यासक्रमाच्या सत्र ६ च्या परीक्षा १५ एप्रिल रोजी सुरू होणार आहेत.

**२९९ परीक्षेच्या तारखा जाहीर**

विद्यापीठ दरवर्षी चार विद्याशाखेच्या ४५० पेक्षा जास्त परीक्षा घेत असते. विद्यापीठाने २०२३-२४ च्या उन्हाळी सत्राच्या मानव्य विद्याशाखेच्या एकूण ६९ परीक्षा, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या ५७ परीक्षा, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या ७५ परीक्षा व आंतर विद्याशाखेच्या ९८ अशा एकूण २९९ परीक्षेच्या तारखा विद्यापीठाने जाहीर केल्या आहेत. अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या परीक्षेच्या तारखा लवकरच जाहीर करण्यात येतील.

**सत्र ६ च्या परीक्षेचे वेळापत्रक जाहीर**

परीक्षेच्या तारखेसोबतच पदवी परीक्षेच्या सत्र ६ च्या सर्व परीक्षांचे वेळापत्रक संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात आले आहे. इतर परीक्षांचे वेळापत्रक लवकरच जाहीर करण्यात करण्यात येईल.

**२ लाखापेक्षा जास्त विद्यार्थी**

या उन्हाळी सत्राच्या परीक्षेमध्ये २ लाखापेक्षा जास्त

विद्यार्थी परीक्षेला बसणार आहेत. यातील १ लाख ७६ हजार विद्यार्थ्यांना जानेवारी महिन्यातच आसन क्रमांक देण्यात आलेले आहेत. तसेच परीक्षेची प्रवेशपत्रे देखील तयार झाली असून लवकरच ती महाविद्यालयाच्या लॉगिनमध्ये देण्यात येतील.

परीक्षा विभागातील परीक्षा व निकाल विभागाचे उपकुलसचिव नरेंद्र खलाणे व त्यांच्या विभागाने आणि त्या त्या विद्याशाखेच्या अधिष्ठात्यांनी या परीक्षांच्या तारखांचे वेळापत्रक तयार केले असून ते तयार करताना त्या त्या विद्याशाखांचे ९० दिवसांचे सत्र, सुट्ट्या व इतर विविध व्यावसायिक परीक्षा याचाही विचार करून या तारखांचे वेळापत्रक तयार केले आहे.

|| **महत्वाच्या परीक्षांच्या तारखा** ||

परीक्षा तारीख

१. बीकॉम सत्र ६ : २२ मार्च २०२४
२. बीए सत्र ६ : ३ एप्रिल २०२४
३. बीएस्सी सत्र ६ : ३ एप्रिल २०२४
४. बीएस्सी - कॉम्प्युटर सायन्स, आयटी व बायोटेक. सत्र ६ : १९ एप्रिल २०२४
५. बीए एमएमसी सत्र ६ : १६ एप्रिल २०२४
६. बीकॉम फिनांशियल मार्केट्स, बीकॉम बँकिंग अँड इन्शुरन्स, बीकॉम अकाऊंटिंग अँड फायनान्स, बीकॉम इन्व्हेस्टमेंट मॅनेजमेंट, बीकॉम फिनांशियल मॅनेजमेंट, बीकॉम ट्रान्सपोर्ट मॅनेजमेंट सत्र व बीएमएस सत्र ६ : १५ एप्रिल २०२४

विद्याशाखानिहाय परीक्षा

विद्याशाखानिहाय परीक्षा संख्या

मानव्य विद्याशाखा व विधी शाखा : ६९
वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा : ५७
विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा : ७५
आंतर विद्याशाखा : ९८

“उन्हाळी सत्राच्या परीक्षा नियोजित वेळेवर घेणे, वेळेत मुल्यांकन करून, निर्धारित वेळेत निकाल जाहिर करणे याचे नियोजन करण्यात आलेले आहे.”

**- डॉ. पूजा रौंदळे,** संचालिका, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, मुंबई विद्यापीठ

निर्मिती आणि संपादन:
**जनसंपर्क विभाग**
मुंबई विद्यापीठ

पत्ता:
**मुंबई विद्यापीठ**
एम. जी. रोड, फोर्ट, मुंबई -४०००३२

प्रकाशक:
**प्रा. बळीराम गायकवाड**
कुलसचिव

info@mu.ac.in www.mu.ac.in @Uni_Mumbai